**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट दिनांक - ०७/०८/२०२२

## दि.०६/०८/२०२२ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ७४८/२०२२ भा.द.वि.कलम ३९२,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ५/८/२०२२ रोजी निशान सर्व्हिस शोरुम समोर, बावधान,पुणे या ठिकाणी सर्व्हीस रोडवर रात्री ११/५० वा दरम्यान घडला असे. |
| गुन्हा दाखल | :- | दिनांक ०६/०८/२०२२ रोजी १२.३२ वा |
| फिर्यादी | :- | प्रधुन्य अनिलकुमार काळगी,वय-२३ वर्षे,धंदा-नोकरी, रा-प्लॉट नंबर ३३ रॉयल हिल्स, अरीहंत इन्स्टीटयुट जवळ, भुंडे वस्ती,सुनारवाडी, बावधान,(बु) पुणे |
| आरोपी | :- | तिन अनोळखी इसम अंदाजे २० ते २५ वयो गटातील. |
| तपशिल | :- | वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे मुंबई वरुन येवुन निसान शोरुम या ठिकाणी उतरुन त्यांचे आईला घेण्यासाठी फोन करुन फिर्यादी त्यांच्या आईची वाट पाहात असताना वरील अनोळखी तिन इसमांनी एका ॲक्टीवा सारखे गाडीवरुन येवुन फिर्यादी यांचे हातातील १०,०००/- रुपये किंमतीचा एक मोटो जी कंपणीचा गोल्डन रंगाचा मोबाईल जबरदस्तीने हिसका मारुन चोरुन नेला आहे.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि खारगे ९०११००२३३३ |

२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | चिखली ४०५/२०२२ भादवी क ३५४(अ) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०६/०८/२०२२ रोजी १९/१५ वा. फिर्यादीचे राहाते ठिकाणी यशवंत हौ.सोसा,मोरेवस्ती,चिखली |
| गुन्हा दाखल | :- | दिनांक ०६/०८/२०२२ रोजी २३/५० वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | विश्वनाथ शंकर भोसले वय ५२ वर्ष रा. राजीव रामबच्चन चव्हाण यांचेकडे भाडेकरू, यशवंत हौ.सोसा,मोरेवस्ती, चिखली पुणे |
| तपशिल | :- | फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे समोरासमोर रहावयास असून वर नमूद केले ता.वेळी फिर्यादी हे त्यांचे राहते घरासमोर कपडे वाळत घालत असताना यातील नमूद आरोपी याने त्याचे पत्र्याचे रूम लगत रस्त्याला लागून असलेल्या ग्रिलचे दरवाजाजवळ येवून फिर्यादी याना शू-शू असा आवाज केला असता फिर्यादी यांनी त्याचेकडे पाहीले तेव्हा त्याने त्याची पॅन्ट खाली करून त्याने त्याचे गुप्तांग हातात धरून फिर्यादीस दाखवले तेव्हा फिर्यादीनी त्याचेपासून लक्ष दूर केला असता त्याने पुन्हा शू-शू असा आवाज करून फिर्यादीचे लक्ष त्याचेकडे वेधीत केले तेव्हा फिर्यादीने त्याचेकडे पाहीले असता तो त्याच स्थितीत उभा राहून फिर्यादीकडे पाहून हसू लागला. अश्या प्रकारे त्याने फिर्यादीचे मनास लज्जा उत्पंन्न होईल असे वर्तन केले.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि सय्यद ९८२३०४१८५१ |

३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | सांगवी ३५१ /२०२२ भा.द.वि. कलम ३०६,३४ प्रमाणे. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दिनांक ०२/०७/२०२२ रोजी ११/०० वाजताचे दरम्यान प्रतिमा बिल्डींगच्या तळमजल्यावरील ऑफीसमध्ये, लेन नंबर ०२, विद्यानगर, नवी सांगवी, पुणे ६१ येथे. |
| गुन्हा दाखल | :- | दिनांक ०६/०८/२०२२ रोजी १७/१६ वाजता. |
| फिर्यादी | :- | सचिन धर्माजी ढवळे, वय ३७ वर्षे, व्यवसाय पोलीस हवालदार/१००२, नेमणुक सांगवी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड, पुणे, मो.नंबर |
| आरोपी | :- | १) अशोक मच्छिंद्र जानराव.वय-६१ वर्षे.रा- रा- जानराव निवास अंबामाता मंदीराजवळ लेन नं ०२ आदर्शनगर नवी सांगवी पुणे २) महिला आरोपी.वय- २९ वर्षे.रा- सदर ३) कुणाल अशोक जानराव.वय- ३४ वर्षे.रा-सदर ४)महिला आरोपी .वय-५३ वर्षे.रा- सदर , **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | यातील मयत इसम मारुती तरटे यांनी घटनास्थळी एक तीन पानांची सुसाईड नोट लिहुन ठेवली होती. व त्या सुसाईड नोटमध्ये त्यांनी त्यांच्या स्वहस्ताक्षरात स्पष्ट लिहीले होते की, मित्रहो मी आज माझं आयुष्य संपविण्याचा निर्णय घेतला. यास अशोक मच्छिंद्र जानराव आणि त्यांच्या प्रियांका जानराव, कुणाल जानराव व त्यांच्या पत्नी लताताई जानराव यांनी सतत माझ्या कुटुंबाची बदनामी केल्याने, मला या जगात राहावसं वाटत नाही. म्हणुन मित्रहो मी आज पुर्ण निर्णय घेतला आहे. माझी जीवणयात्रा संपविण्याचा याला फक्त आणि फक्त जानराव कुटुंबीयच जबाबदार असतील. माझे आयुष्य फक्त जानराव कुटुंबामुळेच संपवत आहे.यातील मयत इसम नामे मारुती गणपतराव तरटे, वय ५० वर्षे, व्यवसाय उद्योगधंदा, पत्ता आदर्शनगर, नवी सांगवी, पुणे यांना आरोपी क्रं १ ते ४ यांनी त्यांना मानसीक त्रास देऊन आत्महत्त्येस प्रवृत्त केल्याने यातील मयत याने गळफास घेवुन मयत झाले आहे व तसेच त्यांचे कुटुंबीय तशी तक्रार देण्यास तयार नसल्याने, म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | |

४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | भोसरी एमआयडीसी ४८४/२०२२ भा.दं.वि. कलम ३२४,३२३,३५२,५०४,१४३,१४७,१४९ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०५/०८/२०२२ रोजी २२/३० वा. ते २३/३० वा. चे सुमारास फिर्यादी यांचे घरासमोर नागेश्वर नगर कॉलनी नं.३, मोशी ता.हवेली जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०६/०८/२०२२ रोजी ०७/३१ वाजता |
| फिर्यादी | :- | निलेश सोपान तळेकर, वय ३५ वर्षे रा. नागेश्वर नगर कॉलनी नं.३, मोशी ता.हवेली जि.पुणे |
| आरोपी | :- | १) अतुल तोत्रे, वय २७ रा. नागेश्वर नगर कॉलनी नं.३, मोशी ता.हवेली २) गणेश तोत्रे वय २९ रा. सदर, (पुर्ण नाव माहीती नाही) ३) अजय मुंढे वय १९ रा. सदर, (पुर्ण नाव माहीती नाही) ४) शुभम साबळे वय २५ रा. शिवाजीवाडी (पुर्ण नाव माहीती नाही) व दोन अनोळखी इसम नाव पत्ता माहीत नाही **आरोपी क्रं ४ अटक आह** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी २२.३० वा आरोपी क्रं २ यास गाडी बाजुला घेण्यास सांगितलेचे कारणावरुन त्याने फिर्यादीस शिवीगाळ केली व दोघांमध्ये बाचाबाची झाली. त्यानंतर आरोपी नं १ याने फिर्यादीस गेटचे बाहेर बोलावुन फिर्यादींचे अंगावर धावुन त्यांना हाताने मारहाण केली व आरोपी नंबर २ ते ४ व दोन अनोळखी इसम यांनी फिर्यादीला पाईपने मारहाण करुन जखमी केले.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा/१०२२ दातार<br>मोनं-९६२३४४११४८ |

५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | चाकण १२५५/२०२२ भा.दं.वि.कलम ३२८,२७२,२७३,१८८ सह अन्न व सुरक्षा मानके कायदा कलम ३०(२)(ए) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०५/०८/२०२२ रोजी २३:१५ वा. चे सुमारास सृष्ठी सोसायटीचे शेजारील मोकळे मैदानात, मेदनकरवाडी, चाकण, पुणे येथे घडला असे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.०६/०८/२०२२ रोजी ०४.५८ वा |
| फिर्यादी | :- | अमर शांताराम कदम,वय ३२ वर्षे, पोलीस शिपाई ब.नं.२८६५, नेमणुक - दरोडा विरोधी पथक,गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड शहर पुणे. |
| आरोपी | :- | १) छोटु हरिप्रसाद गुप्ता, वय २० वर्षे, रा. खंडोबा मंदिर जवळ, मेदनकरवाडी, चाकण,<br>२) तपास गिरी रंजन, रा. चाकण, पुणे.३) कैलास पवार, रा. चाकण, पुणे.<br>४) अजयकुमार गुप्ता, रा. चाकण, पुणे.**आरोपी क्रं १ अटक आहे** |
| तपशिल | :- | वर नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्रं १ यांनी त्याचे मालक पाहिजे आरोपी क्रं २ व ३ यांचे सांगणेवरून आरोपी क्रं ४ याची ५,००,०००/- रु किं ची मारुती सुझुकी कंपनीची सुपर कॅरी गाडी क्रमांक एम.एच १४/जे.एल.२९०६, या मधुन महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा, पान मसाला, तंबाखुजन्य पदार्थ या असुरक्षित आरोग्यास घातक/ अपायकारक पदार्थाची विक्री करण्याच्या उद्देशाने ६,१४,८४०/- रु किंमतीचा प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ हा विक्री करीता जवळ बाळगला असताना मिळुन आला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोसई मडके ९८५०२२९३१६ |

६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | तळेगाव दाभाडे ३६९/२०२२ भादवी ३६४,३२३,३२४,३४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.०६.०८.२०२२ सकाळी ११.३० वा सोमाटणे टोलनाक्यासमोरील जूना जकातनाक्यासमोर हातबूक्कीने ता.मावळ जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.०६/०८/२०२२ रोजी २३/१५ वा. |
| फिर्यादी | :- | व्यंकट नामदेवराव मुडे वय ४४ व्यवसाय चालक रा. फलॅट क्र.३,दूसरा मजला, अमित हेरीटेज, चौराई नगर, सोमाटणे फाटा ता.मावळ जि.पुणे |
| आरोपी | :- | राजू आत्माराम सूगावे, वय ३८ अमित हेरीटेज, चौराई नगर, सोमाटणे फाटा ता.मावळ जि.पुणे व दोन ते तीन इसम **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्रं १ याने हातउसने पैशाचे व्यवहाराचे कारणावरुन फिर्यादीस सोमाटणे फाटा येथे हाताबूक्कीने मारहाण करुन तेथून जबरदस्तीने टू व्हिलरवर घेवून जावून सोमाटणे टोलनाक्या समोरील जूना जकातनाक्या समोर हाताबूक्कीने मारहाण केली. नंतर पून्हा फिर्यादीस जबरदस्तीने शेलारवाडीचे रोडने घेवून जावून लाकडी दांडक्याने मारहाण केली.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि पाटिल ९१३७२७३४५० |

७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | आळंदी २४४/२०२२भा.द.वि.क.४०६,३४ प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | ०४/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वा चे सुमारास माउलीच्या दर्शनाला आळंदी मरकळ रोडने |

|  |  |  |
|---|---|---|
|  |  | तुळजाभवानी मंदिराचे जवळ असले बिल्डींगचे बांधकामा जवळ |
| गुन्हा दाखल | :- | ०६/०८/२०२२ रोजी १२/१२ वाजता |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | अनोळखी दोन इसम वय अंदाजे २५ ते ३० वर्षे |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पायी घरी जात असताना फिर्यादी यांच्या पुढे चालले अनोळखी इमस याने फिर्यादी यांना तुळजाभवानी मंदिराचे जवळ असले बिल्डींगचे बांधकामाजवळ घेवून गेला तो फिर्यादी यांना बोलला की आज्जी पुढे खुप गर्दी झाली आहे.तुमच्या सुरक्षेसाठी तुमचे गळयातील माळ आणी कानातील फुले तुमच्या जवळील असले पाकीटामध्ये ठेवून दया.म्हणजे ते गर्दीत कोणी काढून घेणार नाही.असे म्हणाल्याने फिर्यादी यांचे अंदाजे ३६,३००/- रू किं ८ ग्रॅम वजनाचे सोन्याची माळ व कानातील फुले व रोख रक्कम असे फिर्यादी यांचे जवळील पाकिटात ठेवले व तेथुन निघाले दुसरा अनोळखी इसम हा फिर्यादी यांच्या जवळ आला व म्हणाला की आज्जी पुढे गर्दी आहे.तुमचे पाकिट माझे जवळ दया.गर्दीच्या पुढे गेलोत की मी तुम्हाला तुमचे पाकिट परत देतो असे बोलून त्या दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन दागिने ठेवलेले पाकिट घेवून गेले आहेत म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मपोहवा नलवडे ९६८९८९६२८९ |

०८.

|  |  |  |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | शिरगाव परंदवाडी २८/२०२२ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), १५(क),१७(ब), २९ आर्म ॲक्ट ३(२५) महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम ३७ (१) सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०५/०८/२०२२ रोजी दु. १५.५० वा.मु.पो.सांगवडे, ता मावळ, जि पुणे येथे असलेल्या खंडोबा मंदिराचे जवळ असलेल्या मोकाशी हाईट्सचे समोर असलेल्या मोकळया जागेमध्ये व टेरेसवरील खोलीमध्ये |
| गुन्हा दाखल | :- | दि. ०६/०८/२०२२ रोजी ९/५५ वा. |
| फिर्यादी | :- | प्रदीप छबु शेलार, पोलीस हवालदार ब.नं. ३९९ अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालय |
| आरोपी | :- | १) जयप्रकाश सईराम खिचड, वय २४ वर्षे २) महेशकुमार उर्फ श्याम बाखाराम डाका बिष्णोई, वय २५ वर्षे दोन्ही रा तिसरा मजला मोकाशी हाईट्स, मु.पो. सांगवडे ता मावळ ३) विकास मोहनराम विष्णोई वय ३० वर्षे, रा पांढरेवस्ती पुनावळे, **पाहिजे आरोपी**<br>४) पप्पु उर्फ भगवानराम खमुराम बिष्णोई, रा मोकाशी हाईट्स, मु.पो.सांगवडे ता मावळ जि पुणे मुळ रा जोधपुर राजस्थान ५)सुरेशकुमार जगलामाराम सियाक बिष्णोई रा सदर ६)महिपाल जगलामाराम सियाक बिष्णोई रा सदर७) विकास डाका विष्णोई रा मोकाशी हाईट्स, मु.पो.सांगवडे ता मावळ जि पुणे मुळ रा जोधपुर राज्य राजस्थान **आरोपी क्रं १ ते ३ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी १ ते ३ यांचे ताब्यात १) ५८,२००/- रुपये किंमतीचे ५६ ग्रॅम अफिम असा अंमली पदार्थ २)४९,५००/- रु किंमतीचे एक देशी बनावटीचे पिस्टल व तीन जिवंत काडतुसे, ३)६५,०००/- रुपये किंमतीचा टेम्पो, ४) १६,४५,६९५/- रुपये किंमतीचा ०६ पोत्यांमध्ये एकुण १०९ किलो ६४७ ग्रॅम डुडा अफु वनस्पतीची सुकवलेल्या बोंडांचा चुरा (पॉपि स्ट्रॉ), ५) ०३ मोबाईल, एक मिक्सर, वजन काटा असा एकुण १८,५९,४९५/- रुपये किंमतीचा मुद्देमाल अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या विक्री करीता कब्जात बाळगताना मिळुन आले तसेच सदरचा माल हा त्यांना पाहिजे आरोपी क्रं ४ ते ७ यांनी दिला होता म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि खाडे९९२२२५०४९९ |

९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं | :- | म्हाळुंगे चौकी (चाकण अंतर्गत)१२५८/२०२२ प्राण्यांचा छळ प्रतीबंध कायदा कलम ११(१)(ड), ११(१)(ई), ११(१)(एच), मो वाहन कायदाकलम ८३/१७७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि. ०६/०८/२०२२ रोजी १५.०० वा. चे सुमा.मौजे वराळेगावचे हद्दीमध्ये वराळे ते वासुली फाटा रोडवर, भारत पेट्रोल पंपा समोर, ता.खेड जि.पुणे येथे रोडवर. |
| गुन्हा दाखल | :- | दि. ०७ /०८/२०२२ रोजी ०१.१३ वा |
| फिर्यादी | :- | अशोक निवृत्त गभाले, पो. ना. ११९९ महाळुंगे पोलीसचौकी, पिंपरीचिंचवड, |
| आरोपी | :- | १) प्रमोद दामोदर मिसाळ, वय-३६ वर्षे, रा. मारुंजी, ता. मुळशी, जि. पुणे, अशोक लेलंड, दोस्तगाडी नंबर एम एच १४ जे एल १९४४ वरील चालक २) ईश्वर रघुनाथ पवार , वय ३७ वर्षे रा. चांदखेड, ता. मावळ, जि. पुणे, खरेदीदार **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | वर नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी क्रं १ याचेकडे जनावरे वाहण्याचा कोणताही परवाना नसताना, त्याने त्याचे ताब्यातील ३,००,०००/- रु किं च्या अशोक लेलंड, दोस्तगाडी नंबर एम.एच.१४/जे.एल १९४४ हिचेमध्ये जनावरे वाहतुक करताना मिळून आला व सदर जनावरे खरेदी करणारा इसम आरोपी क्रं २ यांनी सदर गाडीमध्ये १८,०००/- रु किं चे दोन जर्शी गोऱ्हे रस्सीने क्रुरपणे जखडून त्यांना त्यांची हालचाल करता येणार नाही अशा पध्दतीने बांधून निर्दयपणे वागवून त्यांना चारापाण्याची कोणतीही सोय न करता व पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचा परवाना/दाखला नसताना अवैद्यरित्या वाहतुक करीत असताना मिळून आले म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पो. ना. ११३०, टिळेकर,९०११०९८९ ) |